# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.12.2024** **वार – रविवार**

---

**सवाईसमारोप**

पुण्यात सुरू असलेल्या 70 व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची सांगता आज होणार आहे. अखेरच्या दिवशी पंडित संजीव अभ्यंकर यांच्या गायनाने महोत्सवाच्या आजच्या सत्राचा प्रारंभ झाला. या सोहळ्यात प्रतिभावंत ज्येष्ठ गायिका स्वरयोगिनी प्रभा अत्रे यांना श्रद्धांजली देण्यासाठी त्यांचे शिष्यवृंद सहगायन सादर करणार आहेत; या सहगायनानेचं सत्तराव्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाची सांगता होणार आहे.

**पुस्तकमहोत्सव**

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात सुरू असलेल्या पुणे पुस्तक महोत्सवाचाही आज समारोप होत आहे. या महोत्सवाच्या अनुषंगानं अनेक परिसंवाद, चर्चा आणि सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आले. अनेक विक्रमांचीही नोंद या महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झाली. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संविधानाची पुस्तकरूपी प्रतिकृती उभारण्यात आली आहे, यासाठी 97 हजारांहून अधिक पुस्तकांचा वापर करण्यात आला आहे. गेले आठ दिवस सुरू असलेल्या या महोत्सवाला रासिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. आजच्या अखेरच्या दिवशीही पुस्तक प्रेमींनी प्रचंड गर्दी केली आहे.

**चर्चासत्र**

मराठी भाषा संवर्धन समिती, पुणे महानगरपालिका आणि संवाद संस्था यांनी मिळून पुण्यात पहिलं शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन आयोजित केलं आहे. या संमेलनात प्रशासनात बदलत गेलेली भाषा तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रशासन आणि साहित्य’ या विषयांवर चर्चासत्र झालं.

भाषाविषयक चर्चासत्रात प्रशासनातील कामकाजामध्ये सर्वसामान्यांच्या जीवनाचं प्रतिबिंब उमटवणाऱ्या भाषेचा अवलंब झाला पाहिजे, असं मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केलं. बोली भाषेशी निगडित भाषेचा वापर व्हावा, कायदे, नियमांची माहिती सोप्या शब्दांत दिली जावी, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

कृत्रिम बुद्धीमत्ता विषयावरच्या चर्चासत्रात शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्रभावीपणे होत असून यामुळे शासकीय कामं एका क्लिकवर होण्यास मदत मिळेल असं मत मान्यवरांनी व्यक्त केलं.

**अरुणाढेरे**

आधीच्या स्त्री साहित्यिकांचा वारसा आताच्या स्त्री साहित्यिक अधिक प्रगल्भतेनं पुढं नेत असल्या तरी, स्त्री साहित्याचा परिघ अजून विस्तारणं आवश्यक आहे, असं मत ज्येष्ठ लेखिका, कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी काल

पुण्यात व्यक्त केलं. साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे आयोजित 40 व्या स्त्री साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्या बोलत होत्या.

**<u>सौरपॅनेल</u>**

बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयाचे मासिक वीज देयक कमी करण्यासाठी दोन्ही इमारतींच्या छतावर सौरपॅनेल बसवून ऊर्जानिर्मिती केली जाणार आहे. या माध्यमातून पुढील पाच वर्षांत विजेचा खर्च निम्म्यानं कमी करण्याची योजना आखण्यात आली आहे. यातून वीज खर्चात बचत होण्यासोबतच पर्यावरण संरक्षणही होईल असं अधिष्ठाता डॉक्टर एकनाथ पवार यांनी सांगितलं.

**<u>ध्यानधारणादिन</u>**

पहिल्या जागतिक ध्यान धारणा दिनानिमित्त पुण्यातील संचेती रुग्णालयामध्ये ध्यानधारणेचं शास्त्र आणि तंत्र यावर मार्गदर्शनासह प्रात्यक्षिक सादर करण्यात आलं. आंतरराष्ट्रीय वक्ता आणि राजयोग संस्थेतील वरिष्ठ शिक्षिका ब्रह्मकुमारी सरिता राठी यांनी याप्रसंगी मार्गदर्शन केलं. रूग्णालयात दाखल झालेल्या रूग्णामध्ये नकारात्मक विचार आणि भविष्याची चिंता असते. अशा वेळेस मन स्थिर करून, नकारात्मक विचार दूर करून आणि सद्य परिस्थितींचा स्वीकार करून आपण मन सशक्त बनवू शकतो असं सरिता राठी म्हणाल्या.

**<u>गणितसंकल्पना</u>**

थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस म्हणजेच राष्ट्रीय गणित दिन काल पुण्यातल्या न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेमध्ये साजरा करण्यात आला. यानिमित्त भूमितीतील 'सममिती' ही संकल्पना स्पष्ट करणारी 20 चौरस फुटांची भव्य प्रतिकृती शाळेच्या फरसबंद चौकात साकारण्यात आली.

**<u>बाजारसमिती</u>**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कांदा, बटाटा, शेवगा आणि मटारची आवक वाढल्यामुळे त्यांचे भाव स्थिरावले आहेत. पालेभाज्यांच्या दरात घसरण होत असून लिंबू पपई डाळिंब आणि सीताफळाचे भाव वधारले आहेत. लग्न तारखांमुळे फुल बाजारात शोभिवंत फुलांना चांगला उठाव मिळत आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 15 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या किमान तापमानात किंचित वाढ अपेक्षित असून दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

---

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**